# मूर्तिपूजा -

-दादा-पांडुरंगशास्त्री आठवले.

पाश्चात्य लोकांचे तत्त्वज्ञान हे प्रामुख्याने बौद्धिकतेवर आधारलेले आहे. मात्र भारतीयांच्या दृष्टीने तत्त्वज्ञान ही केवळ जीवनाची दृष्टी नसून तो जगण्याचा मार्ग आहे.

पाश्चात्य संत निकोलस यांचा जन्म मध्ययुग आणि आधुनिक युग यांच्या संधिकालात झाला. निकोलस यांचे तत्त्वज्ञान पंधराव्या शतकातील मूलभूत तत्त्वज्ञान मानले जाते. हिंदूंमध्ये जसे मूर्तिपूजेला महत्त्व आहे मूर्तिपूजा हे अनन्यसाधारण तत्त्व आहे, तसाच निकोलसचा सुद्धा तत्त्वत: दृष्टिकोन होता. हिंदूंची मूर्तिपूजा आणि निकोलसच्या आयकॉन Icon ची ध्यानयोगातील भूमिका यांच्यामध्ये विलक्षण साम्य आहे.

"त्याच्या मते ईश्वराचे स्वरूप अमर्याद आहे. त्याची दृष्टी एकाच वेळी सर्वांवर एकसारखी असते. त्याची दृष्टीच त्याचे अस्तित्व दाखवते. त्याची दृष्टी माझ्यावर आहे म्हणून माझे अस्तित्व आहे. जर त्याची दृष्टी माझ्यापासून दूर गेली तर माझे अस्तित्व संपुष्टात येईल." Vision of God या पुस्तकात त्याने आपल्या गूढवादाचे सार सांगितले आहे

आज भारतात जी मूर्तिपूजा सर्वत्र प्रचलित आहे ती खरी मूर्तिपूजा नव्हे! ती चुकीची नव्हे पण तिला शास्त्रीय मूर्तिपूजा म्हणता येणार नाही. खरी मूर्तिपूजा ही मानसशास्त्रीय आणि तात्त्विक



© www.madhaveeradhuveer.com

| November | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| December | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

विचारांवर आधारलेली असते. जे जे दिसतं ते ईश्वरमय आहे. सर्वांच्या हृदयात त्याचाच वास असतो. आपल्या अस्तित्वात त्याचं अस्तित्व सामावलेलं असतं. प्रत्येक जीवाच्या अस्तित्वाचं ते आदिकारण आहे. त्याच्याशिवाय आपण कोणतीही क्रिया करू शकणार नाही. तो अंतःस्थ परमात्मा आपल्या प्रत्येक क्रियेचे नियंत्रण करत असतो. आपण गाढ निद्रेत असताना देखील आपलं हृदय चालू असतं. रक्तप्रवाह अव्याहत सुरू असतो. सर्व शारीरिक क्रिया चालू असतात. गाढ निद्रावस्थेत या क्रिया कोण घडवून आणतो? जे पिंडी तेच ब्रह्मांडी असतं. अणुपासून अवकाशांपर्यंत सर्व विश्वाचं नियंत्रण कोण करतो? या सर्वांच्या मागे एक नियंत्रण सूत्र आहे. पण त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय कसा घेणार? भारतीय तत्त्वज्ञानामध्ये प्रत्यक्ष स्वतः परमेश्वराला जाणून घेण्याच्या क्रियेला 'अपरोक्ष अनुभूती' म्हणतात.

वैदिक तत्त्वज्ञानानुसार जोपर्यंत आपलं मन अशुद्ध आणि अशांत आहे तोपर्यंत आपण ईश्वराला जाणणं शक्य नाही. बायबलमध्येही हेच सांगितलं आहे की ज्याचं मन शुद्ध असतं त्यालाच परमेश्वरप्राप्ती होत असते. म्हणून माणसाने प्रथम आपलं मन विशुद्ध केलं पाहिजे त्याबरोबर ते सशक्त प्रगतिशील आणि तरल बनवलं पाहिजे. अशा पवित्र आणि तरल मनाला अंतःस्थ ईश्वराचं अस्तित्व आणि त्याचा स्पर्श

| January '2010 | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

| February '2010 | | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| Week | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 |

2009



जाणवू शकतो. म्हणून मूर्तिपूजा ही शास्त्रशुद्ध पूजा आहे. मन शुद्ध होण्यासाठी आणि ते सशक्त बनण्यासाठी मूर्तिपूजा मदत करते. अन्यथा तेच मन लोभ, मोह, मद, मत्सर आणि अहंकार यांनी विकारवश होते. भगवद्गीता या पवित्र ग्रंथामधील तत्त्वानुसार ईश्वर हा प्राणिमात्रांच्या हृदयामध्ये असतो.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। १८.६१

हृदि सर्वस्य विष्ठितम। १३.१७

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो। १५.१५

तो आपल्या साऱ्या विचारांचा कृतींचा आणि भावनांचा साक्षीदार आहे. प्रत्येक मनुष्याला शाश्वत सुखाची इच्छा असते परंतु इंद्रियजन्य सुखे कधीच शाश्वत नसतात. स्वप्नविरहित निद्रेत आपण सुखदुःख विसरून एका शांतीचा अनुभव घेतो. निद्रा ही एक प्रकारची आध्यात्मिक स्थिती आहे. ती एक अनैच्छिक क्रिया आहे. जागृतावस्थेतही साधकाला अशा प्रकारची अनुभूती मिळावी हे मूर्तिपूजेचे उद्दिष्ट आहे. ही अनुभूती म्हणजे निद्रेविना निद्रा असते. This is sleepless sleep of the man. यालाच निर्वाण म्हणतात. आध्यात्मिकतेचे तेच अंतिम ईप्सित आहे.

मूर्तिपूजेमुळे दोन गोष्टी साध्य होतात. त्यामुळे मन:शुद्धी होते आणि एकाग्रता साधता येते. आपल्या आराध्य देवताविषयी जर खरीखुरी भक्ती असेल तरच ध्यानधारणेत रस निर्माण होतो. आणि ध्यान सफल होते.

© www.madhavaraghuveer.com

November

| Week | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

December

| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Tuesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Wednesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Thursday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Friday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Saturday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Sunday | 6 | 13 | 20 | 27 | |

9.00 ईश्वर निराकार आणि अनंत आहे. अशा
निराकार ईश्वराचं ध्यान करणे शक्य नाही. तेव्हा
10.00 गुण आणि आकार असणाऱ्या देवतांची मानसिक
आणि आध्यात्मिक आवश्यकता आहे. याच
11.00 गरजेच्या पोटी निकोलसनं आयकॉनची संकल्पना
मांडली. प्रतिमेवर मन एकाग्र करण्याबद्दल त्यांनी
12.00 आपल्या शिष्यांना सांगितलं आणि याचे कारणास्तव
आम्ही भारतीय मूर्तिपूजा करतो. निरनिराळ्या
1.00 मूर्ती वेगवेगळ्या कार्यगुणांचं प्रतिनिधित्व करतात.
ईश्वर अनेक आहेत असा मात्र त्याचा अर्थ
2.00 घेता येणार नाही. हिंदुधर्मात अनेक देवदेवता
आहेत असं मानणं चुकीचं ठरेल. वैदिक धर्मात
3.00 एकेश्वरवादच अनुस्युत आहे.
मन हे अतिशय तरल असतं. त्यामुळे जे
4.00 गुण आपल्याला हवेसे वाटतात ते आत्मसात
करता येतात म्हणूनच ज्या मूर्तीचे आपण
5.00 पूजाध्यान करतो ती मूर्ती अशाच अनुकरणीय
आदर्श गुणांनी युक्त असली पाहिजे. ध्येयमूर्ती,
6.00 गुणाढ्य आणि उच्च पातळीवरची असली पाहिजे.
इष्ट देवताही याच तत्त्वावर आधारित आहेत.
7.00 परमेश्वराशिवाय गुणवान, उच्च, उदात्त कोण आहे?
मग अशा परमेश्वराला दृश्य स्वरूपात कसं आणायचं?
8.00 या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मूर्तिपूजेच्या तत्त्वज्ञानात
गवसतील. मूर्तीचे स्वरूप तिथे दुय्यम ठरतं. मूर्तीच्या
मानसचित्रालाच खरं महत्त्व असतं.

[जर्मनी येथे झालेल्या भाषणाचा सारांश.]